# आरोग्य विभाग - जिल्हा परिषद ठाणे

## मार्च २०१९ च्या जाहीरातीस अनुसरुन दिनांक २६.८.२०२१ रोजी प्रसिध्द केलेली भरती जाहीरात क्र. ०१/२०२१ व जाहिर प्रकटन चे अनुषंगाने

# शुध्दीपत्रक क्रमांक ०१

**शासन निर्देशानुसार, प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्रमांक १ दिनांक २६/०८/२०२१ व जाहिर प्रकटन अन्वये** "माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापि, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने आरोग्य पर्यवेक्षक व आरोग्य सेविका या संवर्गांच्या परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे उमेदवारांना एकाच जिल्हा परिषदेमधुन परिक्षा देता येईल. यासाठी ज्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये रिक्त पदांकरिता अर्ज सादर केले आहेत, अशा उमेदवारांनी परिक्षेकरिता एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प जाहिरातीमध्ये नमूद संकेतस्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर,२०२१ ते १४ सप्टेंबर,२०२१ या** कालावधीत नोंदविणे आवश्यक राहिल." असे प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्रमांक ०१ व जाहिर प्रकटन मध्ये नमुद करण्यात आले होते.

**परंतु याऐवजी**

**आता ग्राम विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था-८, दि ०१ सप्टेंबर २०२१च्या शासन निर्देशानुसार उक्त नमुद प्रक्रिये मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.**

"माहे मार्च,२०१९ च्या जाहिरातीनुसार ऑनलाईन परिक्षेकरिता उमेदवारांना एक किंवा एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमधील एक किंवा अधिक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा होती. तथापी, आता शासनाचे महापरिक्षा पोर्टल रद्द झाल्याने सदरची आरोग्य विभागाशी संबंधीत पदभरती ही OMR Vendor मार्फत Offline पध्दतीने राबविण्यात येणार असल्याने उपरोक्त आरोग्य पर्यवेक्षक व आरोग्य सेविका या संवर्गांची परिक्षा राज्यात सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे उमेदवाराला एकाच जिल्हा परिषदेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून परिक्षा देता येणार आहे. तथापि आरोग्य पर्यवेक्षक व आरोग्य सेविका संवर्गाच्या पदभरती संदर्भात घेण्यात येणाऱ्या परिक्षेसाठीच्या प्रत्येक संवर्गाची प्रश्नपत्रिका सर्व जिल्हा परिषदांसाठी संवर्गनिहाय सामायिक राहाणार आहे. त्यामुळे सन २०१९ च्या जाहिरातीनुसार ज्या उमेदवारांनी एक किंवा एकापेक्षा अधिक संवर्गांच्या परिक्षेसाठी एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदेमधुन अर्ज भरलेले आहेत त्या उमेदवारांचे सर्व ठिकाणी भरलेले अर्ज ग्राहय धरले जातील. अशा उमेदवारांबाबत त्याने प्रत्यक्ष एकाच जिल्हा परिषदे अंतर्गत आयोजित परिक्षेस उपस्थित राहून परिक्षा दिल्यानंतर सदर परिक्षेमध्ये त्याला प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे त्याने ज्या ज्या जिल्हा परिषदेतून सदर पद भरतीसाठी अर्ज भरला आहे त्या त्या जिल्हा परिषदांच्या सदर पदांकरिताच्या तयार होणाऱ्या गुणवत्ता (प्रवर्गनिहाय) यादीमध्ये त्याचे नाव गुणवत्ता क्रमांकानुसार अंतर्भुत केले जाईल.

Scanned with CamScanner

तसेच उक्त शासन निर्देशानुसार उमेदवारांनी मार्च २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे भरलेले परिक्षा शुल्क प्राप्त करुन घेण्यासाठी आता बँक तपशील संकेतस्थळावर नमूद करण्याची आवश्यकता नाही.

मार्च २०१९ च्या जाहीराती प्रमाणे एकापेक्षा जास्त जिल्हा परिषदांमध्ये अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी आता संकेतस्थळावर जिल्हयाचा विकल्प देण्याची आवश्यक्ता नाही.

तसेच, नव्याने समाविष्ट झालेले दिव्यांग प्रवर्ग व खुल्या प्रवर्गात नव्याने वाढ झालेल्या रिक्त जागांसाठी प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीनुसार परिक्षेला बसु इच्छिणाऱ्या उमेदवाराला विभागाच्या दिनांक २३/०७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार एक किंवा एकापेक्षा अधिक जिल्हा परिषदांमध्ये पदांसाठी अर्ज करता येईल. तसेच एका उमेदवाराला एका किंवा अनेक संवर्गातील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा राहिल परंतु प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारले जाईल. तसेच उमेदवारांने परिक्षेसाठी उपस्थित राहाण्याकरिता जिल्हा परिषदेचा विकल्प देणे आवश्यक आहे. याबाबत www.maharddzp.com या संकेत स्थळावर जाऊन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उमेदवारास प्रवेशपत्र पाठविण्यात येईल. तसेच, सदर उमेदवारांबाबतही परिक्षा व गुणवत्ता यादीबाबतची कार्यपध्दती वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे राहिल " असे वाचावे.

**करिता प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्रमांक १ मध्ये खालील प्रमाणे ठाणे जिल्हा परिषदेशी संबंधित उमेदवारांना भरती प्रक्रिया संदर्भात खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.**

३. ठाणे जिल्हा परिषदेतील माहे मार्च २०१९ च्या जाहिरातीमध्ये दर्शविलेली आरोग्य सेविका (बिगर पेसा) संवर्गातील सर्व पदे सर्व प्रवर्गासह निरंक (००) झाल्याने तसेच आरोग्य पर्यवेक्षक संवर्गातील खुला (सर्वसाधारण) प्रवर्गातील एक पद कमी झाल्याने सदर पदांसाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना संकेत स्थळावर इतर जिल्हा परिषदेचा विकल्प देताना ठाणे जिल्हा परिषद ऐवजी इतर एक किंवा एका पेक्षा अधिक जिल्हा परिषदांचा विकल्प देता येईल. तथापी सादर करत असलेल्या विकल्पांपैकी परिक्षा केंद्रासाठी मात्र कोणत्याही एकाच जिल्हा परिषदेचा विकल्प सादर करणे बंधनकारक आहे.

४. मार्च २०१९ मधील प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत आरोग्य सेविका (पेसा) या संवर्गात दिव्यांग प्रवर्गासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांव्यतीरिक्त शासन निर्णयानुसार नव्याने समाविष्ठ झालेल्या दिव्यांगांच्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी जाहिरातीत नमुद सर्व बाबी जशाच्या तशा लागू राहतील. परंतु नव्याने अर्ज सादर करित असलेल्या उमेदवारांना फक्त ठाणे जिल्हा साठीच अर्ज सादर करावयाचे असून त्यांची परिक्षा देखिल ठाणे जिल्हा परिषदे अंतर्गत केंद्रावरच घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. मनिष रेंघे**<br>**सदस्य सचिव,**<br>**जिल्हा निवड समिती,**<br>**तथा**<br>**जिल्हा आरोग्य अधिकारी**<br>**जिल्हा परिषद ठाणे** | **डॉ. भाऊसाहेब दांगडे (भाप्रसे)**<br>**सदस्य**<br>**जिल्हा निवड समिती,**<br>**तथा**<br>**मुख्य कार्यकारी अधिकारी,**<br>**जिल्हा परिषद ठाणे** | **राजेश नार्वेकर (भाप्रसे)**<br>**अध्यक्ष**<br>**जिल्हा निवड समिती,**<br>**तथा**<br>**जिल्हाधिकारी,**<br>**ठाणे** |

Scanned with CamScanner